# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २२/०७/२०२४ (सोमवार) दुपार**

---

### पो.स्टे. खापरखेडा हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २१/०७/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना चनकापुर येथे वार्ड क्र. ०६ येथे क्वार्टर नं. ५२/३ येथे काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून सदर पथकाने

वार्ड नं. ०६, चनकापुर डब्ल्यु सी एल कॉलनी येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) रमेश उर्फ पुट्टी रामकीसन रविदास वय ३६ वर्षे रा. वार्ड नं. ०३ चनकापुर १२५/५ २) विनीत मधुबन सिंग, वय ३६ वर्षे रा. वार्ड नं. ०६ चनकापुर क्वॉर्टर नं. ४२/१ ३) रोहीत देसराज सुर्यवंशी वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ०३ झुलालाईन चनकापुर ४) इरसाद मोहउद्दीन अंसारी वय ४१ वर्षे, रा. वार्ड नं. ०४ इंदीरा नगर आबादी ५) निरज उर्फ बहुवा बाबा यादव वय २६ वर्षे रा. वार्ड नं. ०३ कवडस पाटनसावंगी ६) शाबीर उर्फ हांडी इसराईल सिद्दीकी वय ३२ वर्षे, वार्ड नं. ०३ चनकापुर ७) मेहताब अहमद खान, वय ३४ वर्ष, रा. वार्ड नं. ०३ चनकापुर क्वा. नं. १२२/७ ८) फिरोज अहमद सिद्दीकी वय ३५ वर्षे रा. वार्ड नं. ०३ चनकापुर क्वा. नं. १२६/१ ९) सुरज रेशम उईके, वय २२ वर्षे रा. वार्ड नं. ६ चनकापुर वस्ती १०) शहनशाहा छुट्टन सिद्दीकी, वय ४० वर्षे रा. वार्ड नं. ०६ चनकापूर वस्ती ११) असरार छुट्टन सिद्यीकी वय ३३ वर्ष, रा. वार्ड नं. ०६, चनकापुर क्वा. नं. १४७/५** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ११ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ११६२०/— रू. ५२ ताशपत्ते असा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि. धनाजी जळक, सपोनि फाल्गुन घोडेस्वार, पोहवा प्रफुल राठोड, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, पोना राजू भोयर, पोअं. राजकुमार सातुर, मपोहवा कविता गोंडाने यांनी पार पाडली.

# शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे कोंढाळी अंतर्गत फिर्यादी नामे— सुनील मंछीद्रनाथ सुरडकर वय ३७ वर्ष रा. वाटोडा ता. आर्वी जि. अमरावती हे महाराष्ट्र परिवहन विभागात काम करत असुन एसटी बस डेपो काटोल येथे कार्यरत आहे. दि. २०/०७/२०२४ रोजी १९.३० वा. दरम्यान मौजा कलकुही शिवार येथे फिर्यादी हे बस क्र. एम एच— ४०/एन ८९०७ व कंडक्टर म्हणुन कामावर होते व कोंढाळी बस स्टेशन वरून काटोल करीता निघाले असता सदर बसमधील नमुद **आरोपी नामे— प्रदीप रामदास कौरती वय ३२ वर्ष रा. काटोल** याने फिर्यादी यांनी टिकीट काढायला लावली असता नमुद आरोपी याने फिर्यादीला त्याचे हातातली कडयाने पाठीवर मारले व शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिली व फिर्यादी हे शासकीय काम करीत असता त्यामध्ये अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे आरोपीविरूद्ध कलम १३२, १२१(१), ३५२, ३५१(२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**